Marketing & Publicity Department
Head Office, Pune
agmmkt@mahabank.co.in; cmmedia@mahabank.co.in

# *‘महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजना 2019* संदर्भात राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या विशेष बैठकीचे बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे आयोजन



**(फोटोमध्ये:** श्री ए. एस. राजीव, व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ बँक ऑफ महाराष्ट्र माननीय मुख्यमंत्री श्री उद्धव ठाकरे यांचा सत्कार करताना सोबत उपमुख्यमंत्री श्री अजीतदादा पवार)

**पुणे, 4 जानेवारी, 2020:** महाराष्ट्र राज्य बँकर्स समितीचे निमंत्रक बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे राज्य शासनाच्या महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजना – 2019 बाबत रूपरेषा आणि योजनेच्या कार्यान्वयन संदर्भात मंत्रालयामध्ये राज्याचे मुख्यमंत्री श्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. उपमुख्यमंत्री श्री अजीतदादा पवार आणि कॅबिनेट मंत्री श्री जयंत पाटील यावेळी उपस्थित होते. मुख्य सचिव श्री अजॉय मेहता, अतिरिक्त मुख्य सचिव श्री देबाशीष चक्रवर्ती, वित्त विभागाचे सचिव श्री मनोज सौनक, सचिव श्रीमती आभा शुकला यासह शासनाचे वरिष्ठ अधिकारी, भारतीय रिझर्व्ह बँक, नाबार्ड आणि सभासद बँकांचे प्रतींनिधी उपस्थित होते.

राज्य शासनाने दिनांक 27 डिसेंबर 2019 रोजी कर्जमुक्ती संदर्भात लागू केलेया राज्य शासनाच्या महात्मा जोतिराव फुले कर्ज मुक्ती योजनेबाबत रूपरेषा विषयांतर्गत एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये बँकर्सच्या भूमिकेबाबत योजनेवर चर्चा करण्यात आली. महाराष्ट्र राज्य बँकर्स समितीचे अध्यक्ष आणि बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ श्री ए. एस. राजीव यांनी यावेळी उपस्थितांचे स्वागत करून सत्कार केला.

महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजना-2019 मध्ये लघु मुदतीच्या पीक कर्जाबाबत (मोसमी पीक कर्जे आणि किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत कर्जे) दिनांक 01.04.2005 ते 31.03.2019 दरम्यान वितरित झालेली मध्य मुदतीची पीक कर्जे जी पुनर्गठीत होवून लघु मुदतीच्या पीक कर्जे आणि रुपये 2.00 लाखापर्यंतची मुद्दल आणि व्याज रक्कम यामधून थकीत झालेली आणि 30.09.2019 पर्यन्त रक्कम न भरलेली कर्जे या कर्जमुक्ती अंतर्गत योजनेसाठी पात्र आहेत.